# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०१/२०१८

**१) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक २०/०१/२०१८ चे १३.०० ते १४.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी विजय कुडंलिक सुर्यवंशी वय ४७ वर्ष रा. पवनी ने तहसील कार्यालय पवनी येथील टिनाचे खुल्या सेड मध्ये आपली काळया रंगाची पॅशन प्रो.मोटार सायकल क्र. एमएच ४९ आर २११३ किंमती १८,०००/रु. ही ठेवुन हॅन्डल लॉक तोडुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २१/०१/२०१८ चे १७.५५ वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारुचे नशेत मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. उदापुरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. भुरले पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक २१/०१/२०१८ चे १९.१५ ते २०.०० वाजता. दरम्यान यातील मृतक भैय्यालाल चैतराम रोडगे वय ६० वर्ष, रा. आंबेडकर वार्ड तुमसर हा मुळव्याध, पोटाच्या व हरनियाचे त्रासाला कंटाळुन क्लॅसिक टॉकीज येथील ॲगलला नॉयलान दोरीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी विशाल भैय्यालाल रोडगे वय २५ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक २१/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर,येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी दारू किंमती ५,००/—रु, चा माल जप्त करण्यात आला.

**<u>५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–</u>**

दिनांक २१/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी– ०३, तीन सिटर वाहनांवरती– ०७ केसेस व ईतर वाहनांवरती – १११ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.